



दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज
• छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे । मो. : 9822152955

बीड–महाराष्ट्र | सोमवार दि. २७ एप्रिल २०२६ | वर्ष ६ वे | अंक ३९ | पाने ४ | पान १ | किंमत ३ रुपये

RNI/MAHMAR/2021/80074 | Post : Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-27 | https://epaper.marathwadapatra.com | E-mail : dailymarathwadapatra2021@gmail.com











# लाडकी बहीण योजनेत 12 हजार सरकारी कर्मचाऱ्यांची धक्कादायक कारस्थानं!

## कोट्यवधी उडवले; आता सरकारने मोठा निर्णय घेतला

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र सरकारच्या मुख्यमंत्री 'माझी लाडकी बहीण योजने'त मोठ्या प्रमाणावर अनियमितता उघडकीस आल्यानंतर प्रशासनाने कठोर भूमिका घेतली आहे. ताज्या आकडेवारीनुसार, सरकारने आतापर्यंत अपात्र लाभार्थ्यांकडून अंदाजे ११ कोटी रुपये वसूल केले आहेत.

धक्कादायक बाब म्हणजे, या योजनेचा गैरफायदा घेणाऱ्यांमध्ये मोठ्या संख्येने सरकारी कर्मचारी आणि पुरुष आहेत. जे पात्रतेच्या निकषांनुसार स्पष्टपणे अपात्र होते.




प्राथमिक तपासात सरकारने सुमारे २,४०० कर्मचाऱ्यांची ओळख पटवली होती, परंतु आरटीआयद्वारे मिळालेल्या माहितीनुसार, किमान १२,९१५ सरकारी कर्मचाऱ्यांनी बेकायदेशीरपणे १,५०० रुपयांची मासिक मदत घेतली होती. अनेक विभागांनी अपात्र कर्मचाऱ्यांच्या पगारातून थेट रक्कम कापायला सुरुवात केली आहे. महाराष्ट्र नागरी सेवा नियमांनुसार दोषी कर्मचाऱ्यांची पदोन्नती आणि मूल्यमापन थांबवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. कारवाईच्या भीतीने, काही लाभार्थ्यांनी स्वेच्छेने पैसे परत केले आहेत आणि योजनेतून आपली नावे काढून टाकली आहेत. तपासात असेही उघड झाले आहे की, या योजनेअंतर्गत पुरुषांच्या खात्यातही कोट्यवधी रुपये हस्तांतरितकरण्यात आले होते. ऑक्टोबर २०२५ पर्यंत, अंदाजे १२,४३१ पुरुष आणि ७७,९८० अपात्र महिलांना चुकीच्या पद्धतीने १६४.५२ कोटी रुपये देण्यात आले होते.

महिला व बाल विकास विभागाचे (थउऊ) सचिव अनुप कुमार यादव यांनी पुष्टी केली आहे की, पुरुष लाभार्थ्यांकडूनही लवकरच वसुलीची प्रक्रिया सुरू केली जाईल. प्रशासकीय अधिकाऱ्यांनी या अनियमिततेला केवळ सुरुवात म्हटले असून, याहून मोठे घोटाळे उघडकीस येऊ शकतात असे सुचवले आहे. सखोल तपासानंतर, अंदाजे ५७ लाख लाभार्थ्यांना यादीतून वगळण्यात आले आहे. सध्या या योजनेअंतर्गत १.५७ कोटी लाभार्थी असून त्यासाठी सरकारने ३६,००० कोटी रुपयांचे बजेट मंजूर केले आहे. महिला आणि बाल विकास मंत्री अदिती तटकरे यांनी जाहीर केले आहे की, लाभार्थ्यांच्या ई–केवायसी पडताळणीची अंतिम मुदत ३० एप्रिल २०२६ पर्यंत वाढवण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व सुनेत्रा पवार यांच्याशी चर्चा केल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला. पात्र लाभार्थ्यांसाठी आपली कागदपत्रे नियमित करण्याची ही शेवटची संधी असेल.

# डॉनाल्ड ट्रम्प उपस्थित असलेल्या कार्यक्रमात अंदाधुंद गोळीबार

## ट्रम्प बचावले, भारताची पहिली प्रतिक्रिया

**वृत्तसंस्था**

वाशिंग्टन – अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प उपस्थित असलेल्या वॉशिंग्टनमधील हिल्टन हॉटेलमधील एका कार्यक्रमात शनिवारी रात्री गोळीबाराची धक्कादायक घटना घडली. 'व्हाईट हाऊस कॉरस्पॉन्डंट्स डिनर' सुरू असताना मोठे आवाज ऐकू आले, ज्यामुळे एकच खळबळ उडाली. या घटनेनंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी



ट्विट करत भारताची भूमिका स्पष्ट केली असून ट्रम्प यांच्या सुरक्षेबद्दल समाधान व्यक्त केले आहे. पंतप्रधान मोदींची प्रतिक्रिया या घटनेवर

▶▶ उर्वरित पान २ वर

### ● ट्रम्प यांनी घेतली पत्रकार परिषद

**या हल्ल्यानंतर डोनाल्ड ट्रम्प यांनी पत्रकार परिषद घेऊन सुरक्षा दलांच्या तत्परतेचे कौतुक केले. ट्रम्प म्हणाले, हा हल्ला अनपेक्षित होता, मात्र सीक्रेट सर्व्हिसने अतिशय वेगाने कारवाई केली. एका सशस्त्र व्यक्तीने सुरक्षा चौकीवर हल्ला करण्याचा प्रयत्न केला, पण आमच्या शूर जवानांनी त्याला रोखले. या घटनेत एका सुरक्षा अधिकाऱ्याला जवळून गोळी लागली, मात्र बुलेटप्रूफ जॅकेटमुळे त्याचे प्राण वाचले. ट्रम्प यांनी या घटनेचा व्हिडिओ सार्वजनिक करण्याचे आदेशही दिले आहेत. या घटनेमुळे अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांच्या सुरक्षेवर पुन्हा एकदा मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.**

# आधी छत्रपती शिवरायांवर वादग्रस्त वक्तव्य

## राज्यात संतापाची लाट उठताच बागेश्वर बाबांचा माफीनामा

**नागपूर । प्रतिनिधी**

छत्रपती शिवरायांच्या हिंदवी राज्याच्या स्थापनाकडे पाहून आम्ही हिंदू राष्ट्राचे स्वप्न बघत आहोत. छत्रपती शिवरायांचा अवमान तर सोडा, त्यांच्याविषयी आम्ही स्वप्नातही वाईट ऐकू शकत नाही किंवा पाहू शकत नाही. माझ्या विधानाला वेगळ्या पद्धतीने दाखवले गेले, मला खूप वाईट वाटते आहे. ज्यांना माझ्या विधानाने वाईट वाटले असेल त्यांची मी माफी मागतो, दिलगिरी व्यक्त करतो, असे बागेश्वर बाबांनी म्हटले. नागपूरमध्ये एका आयोजित कार्यक्रमात धीरेंद्र शास्त्री यांनी छत्रपती शिवरायांबद्दल



अकलेचे तारे तोडले. छत्रपती शिवराय लढून थकले. अखेर त्यांनी समर्थ रामदास यांना राजपाट सांभाळण्याची विनंती केली, असे धीरेंद्र शास्त्री म्हणाले. विशेष म्हणजे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांच्या उपस्थितीत त्यांनी शिवरायांवर वादग्रस्त वक्तव्य केले. त्यांच्या विधानाने राज्यभरात संतापाची लाट उसळली. त्यानंतर धीरेंद्र शास्त्री यांनी माफी मागितली.

ज्यांच्या भावनांना ठेच पोहोचली असेल त्यांची मी माफी मागतो– छत्रपती शिवरायांच्या मनात गुरूंबद्दल किती आदर होता, हे दाखविण्यासाठी मी माझ्या भाषेमध्ये संबंधित वक्तव्य केले होते.

▶▶ उर्वरित पान २ वर

# राज्याच्या शिक्षण विभागाचा अजब अन् असंवेदनशील प्रकार

## भर उन्हाळ्यात चौथी आणि सातवीची शिष्यवृत्ती परिक्षा



### विद्यार्थ्यांसह पालकांनाही प्रचंड मनस्ताप ; एसीमध्ये बसून वेळापत्रक तयार करणारे अधिकारी झोपा काढत होते का ?

**बीड । प्रतिनिधी**

राज्याच्या शिक्षण विभागाचा अजब आणि असंवेदनशील प्रकार पुन्हा एकदा समोर आला आहे. महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषदेने ऐन उन्हाळ्यात ते ही ४१ अंश डिग्री सेल्सीयस एवढे प्रचंड तापमान असतांना चौथी आणि सातवीची शिष्यवृत्ती परिक्षा घेतली आहे. सकाळच्या सत्रात पहिला पेपर झाला असून दुपारी २ वाजता दुसरा पेपर सुरू झाला आहे. प्रचंड उन्हामध्ये परिक्षा घेऊन शिक्षण विभागाने नेमके काय साध्य केले ? असा प्रश्न उपस्थित होत आहे. आजच्या या शिष्यवृत्तीच्या परिक्षामुळे विद्यार्थ्यारसह पालकांनाही प्रचंड मनस्ताप सहन करावा लागला. या प्रकरणात राज्य शासनाने चौकशी करून परिक्षेचे नियोजन करणाऱ्या संबंधित विभागाविरूध्द कारवाई करावी अशी मागणी होऊ लागली आहे. बीड जिल्ह्यात आज चौथी आणि सातवीच्या शिष्यवृत्ती परिक्षा होत आहे. सकाळच्या सत्रात पहिला पेपर झाला असला तरी दुपारी २ नंतर दुसरा पेपर सुरू झालेला आहे. चौथी आणि सातवीचे शिष्यवृत्ती परिक्षा

▶▶ उर्वरित पान २ वर

# तांबवा येथे चार ठिकाणी घरफोडी

## रोख २ लाख आणि दागिन्यासह ३ लाख ३३ हजाराचा ऐवज लांबविला ; घटनास्थळी श्वानपथक आणि ठसे तज्ज्ञांचे पथक

**बीड । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील तांबवा येथे अज्ञात चोरट्यांनी चार ठिकाणी घरफोडी करीत रोख २ लाख ३६ हजार रु. आणि सोन्याच्या दागिन्यासह ३ लाख ३४ हजाराचा ऐवज लांबविला आहे. शनिवार दि. २५ एप्रिल रोजी मध्यरात्री १:०० ते ३:०० वाजेच्या दरम्यान तांबवा ता. केज येथे २५ एप्रिल रोजी मध्यरात्री अज्ञात चोरट्यांनी शंकर भगवानराव चाटे यांच्या घरात प्रवेश केला. घरातील ९० हजार रुपये किंमतीचे दीड तोळ्याची बोरमाळ, एक तोळ्याचे गंठण, पाच ग्रॅमचे झुंबर व त्यांचे भाऊ शिवाजी चाटे यांनी शेतीमाल विक्रीचे ठेवलेले २ लाख रुपये असा २ लाख ९० हजार रुपयांचा ऐवज घेऊन चोरट्यांनी माणिक यशवंत चाटे यांच्या घरी गेले. त्यांच्या घरातील शेतीमाल विक्रीचे २५ हजार रुपये व दीड हजाराची घड्याळ घेऊन सखाराम जनार्धन चाटे यांच्या घरी गेले. त्यांच्या घरातील नगदी पाच हजार रुपये घेऊन चोरटे आशाबाई भिमराव चाटे यांच्या घरात गेले. त्यांच्या घराची झडती घेऊन नगदी ६ हजार रुपये व सहा हजार रुपयांचे सोन्याचे मणी घेऊन

▶▶ उर्वरित पान २ वर

# पैशाची लवकर व्यवस्था न केल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा

## ठेवीदारांच्या प्रश्नावर उल्हास गिराम आक्रमक

**बीड । प्रतिनिधी**

कुटे ग्रुपच्या ज्ञानराधा मल्टीस्टेट अर्बन बँकेसह बीड जिल्ह्यातील पाच ते सहा मोठ्या अर्बन बँकांमध्ये हजारो ठेवीदारांचे पैसे अडकले आहेत. परंतु जिल्हा प्रशासन अत्यंत निष्क्रिय असून केवळ पाहत बसले आहे. हा प्रकार संतापजनक असून ठेवीदारांच्या जखमेवर मीठ चोळणारा आहे. जिल्ह्यातील गोरगरीब सामान्य नागरिकांनी आपल्या जीवनभराच्या कष्टाची कमाई मुदत ठेवीच्या रूपाने बँकांमध्ये ठेवली होती. त्या पैशांवर त्यांचा उदरनिर्वाह चालत होता. परंतु आज त्यांचे संपूर्ण जीवन उध्वस्त झाले आहे. कायद्यानुसार, जिल्हा प्रशासनाने बंद पडलेल्या अर्बन बँकांच्या सर्व मालमत्ता जप्त करून त्या बाजारभावाने लिलावात विकून ठेवीदारांचे पैसे वाटप करावे. अन्यथा जिल्हा प्रशासनाविरोधात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा



शिवसेना (ठाकरे) जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी दिला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, ज्ञानराधा मल्टीस्टेट अर्बन बँक कुटे ग्रुपवरील कारवाईमुळे बंद पडली आहे. संबंधितांना योग्य मार्गदर्शन करून सुधारणा करण्याची संधी देण्याऐवजी थेट कारवाई झाल्यामुळे ठेवीदार पूर्णपणे उद्धस्त झाले आहेत. भारतीय राज्यघटनेनुसार नागरिकांच्या जीवित आणि संपत्तीचे संरक्षण करणे ही राज्याची जबाबदारी आहे. असे असताना आजपर्यंत ज्ञानराधा बँकेच्या ५० पेक्षा जास्त ठेवीदारांनी आत्महत्या केल्याचा गंभीर प्रश्न उपस्थित झाला आहे. याला जबाबदार कोण ? शुभकल्याण मल्टीस्टेट अर्बन बँक २०१६ मध्ये बंद पडली. ठेवीदारांचे पैसे मिळावेत म्हणून मोठा आक्रोश करण्यात आला. त्यानंतर एक प्रशासक (अवसायक ) नेमण्यात आला, परंतु त्यांनी आजपर्यंत काय काम केले,

▶▶ उर्वरित पान २ वर



◆ संपादकीय...

## ठेवीदारांच्या पैशाला स्वतःची मालमत्ता समजू नका

अनेक मल्टिस्टेट पतसंस्था, नागरी बँका सहकारी पतसंस्था यांनी ठेवीदारांना गंडवलेच्या घटना काही नवीन नाहीत आणि हा प्रकार सर्व संचालक आणि अध्यक्ष आणि बँकेचे कर्मचारी अधिकारी यांना विचारात घेऊनच केला जातो कोणताही एक माणूस बँक बुडण्याला (दिवाळखोरीला) जबाबदार नसतो कोणाची काही नाराजी झाली की अंदर की बात बाहेर येते यात शंका नाही, आणि विशेष म्हणजे जे कर्ज व्यवसायावर दिले जातात ते व्यवसाय फर्म अस्तित्वात आहे की नाही हे पाहणे कोणत्याही बँक व्यवस्थापणाचे असते मात्र हमाम मे सब नंगे म्हटल्यावर बोगस कर्ज वाटप होणार यात तिळमात्र शंका नाही ज्यांच्याकडून अश्या चुका झाल्या असतील त्यांनी वेळीच सुधारणे अपेक्षित असते वार्षिक तपासणी अहवाल प्रत्येक वर्षी केला जात असताना या बाबी लक्षात का येत नाहीत की ऑडिटर सुद्धा जाणीवपूर्वक या सर्व प्रकाराला पाकीट दिले की पांघरून घालते का ? बँक, मल्टिस्टेट, पतसंस्था यांचे वार्षिक ऑडिट होते मग या बँकेची, पतसंस्थाची, मल्टिस्टेट ची स्थिती काय असेल हे संचालक यांना माहीत नसते का ? की जाणीव पूर्वक दुर्लक्ष करून स्वतः च्या उद्योग व्यवसायासाठी ठेवीदारांचा पैसा स्वतःची मालमत्ता समजून वापरायला भेटतो म्हणून ठेवीदारांच्या विश्वासाला तडा गेला चालेल अशी मानसिकता ठेऊन जर हे बँक चालवणारे लोक आपले मनसुबे ठेवत असतील तर एक ना एक दिवस बँक आणि ठेवीदारात 'वाद ' झाल्याशिवाय राहणार नाही आणि ठेवीदारांची आणि बँकेची संपूर्ण' वाट लागल्याशिवाय राहणार नाही हे गांभीर्याने लक्षात घेणे गरजेचे आहे, सहकाराचा नियम आहे ज्यांच्याकडे आहे त्यांच्याकडून घेणे आणि ज्यांना नाही त्यांना देणे (विना सहकार नाही उद्धार) मात्र सर्व नियमांना हरताळ फसण्याचे काम होणार असेल तर चांगल्या बँकांवर देखील जनता विश्वास ठेवणार नाही आणि सर्व मार्केट ओस पडेल, मागील काही दिवसात अनेक मल्टिस्टेट पतसंस्था, बंद पडल्या आणि ठेवीदार कंगाल झाले अशीच अवस्था पुन्हा निर्माण होऊ नये आणि ठेवीदारांचे नुकसान होऊ नये असे वाटत असेल तर बँक चालकांनी ठेवीदारांच्या पैशाचा गैरव्यवहार होणार नाही याची काळजी घेणे अपेक्षित आहे, नियमांचे उल्लंघन करून अनेक ठिकाणी तर संचालक यांनीच लाखोंचे कर्ज घेऊन बसले आहेत जे की ते नियमात नाही मग असे प्रकार होत असतील तर बँक बुडायला वेळ लागणार नाही, अजून अनेक पतसंस्था मल्टिस्टेट सहकारी, नागरी बँका चांगल्या आणि विश्वास पात्र आहेत मात्र त्यांना देखील बँकेच्या अफवेने आणि बोगसगिरी मुळे त्रास सहन करावा लागत आहे हे तितकेच खरे.

**– अशोक होळकर**

# मेळघाट हाट :दुर्गम भागातील महिलांच्या उत्पादनांना मिळाले हक्काचे व्यासपीठ

अमरावती जिल्ह्यातील मेळघाट क्षेत्रातील दुर्गम भागात राहणाऱ्या स्वयंसहाय्यता महिला बचतगटांच्या श्रमाला आणि त्यांच्या कौशल्यातून साकारलेल्या उत्पादनांना 'मेळघाट हाट' विक्री केंद्राच्या माध्यमातून हक्काचे व्यासपीठ प्राप्त झाले आहे. महिलांच्या आर्थिक आणि सामाजिक सशक्तीकरणासाठी राबविण्यात आलेल्या अशा अभिनव उपक्रमांना सर्व स्तरावरून प्रोत्साहन मिळत आहे. जिल्हा वार्षिक योजनेतून जिल्हा परिषद, महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) व महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांच्या संयुक्त विद्यमाने अमरावती येथे सायन्सकोर प्रांगणालगत आधुनिक महिला बचत गट उत्पादन विक्री केंद्र सुरु आहे. हे विक्री केंद्र ५ जानेवारी २०२५ पासून नागरिकांच्या सेवेत आहे. मेळघाट हाटच्या माध्यमातून आदिवासी क्षेत्रातील उत्पादित साहित्याला प्रथमच शहराच्या मध्यवस्तीत हक्काचे विक्री केंद्र मिळाले आहे. या मॉलच्या माध्यमातून उत्पादित वस्तूंची थेट ग्राहकांना विक्री होत असल्याने मध्यस्थांची साखळी मोडीत निघत असून बचत गटातील महिलांच्या उत्पन्नात विशेष वाढ होत आहे. या ठिकाणी ग्राहकांसाठी मेळघाटातील वैविध्यपूर्ण वनौषधी, बांबूपासून बनविलेल्या कलाकुसरीच्या वस्तू, रानमेवा आणि शुद्ध मध यासारख्या दुर्मिळ वस्तूंची मोठी श्रेणी खरेदीसाठी उपलब्ध आहे. आदिवासी महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी महिला बचत गटांना सातत्याने प्रोत्साहन देऊन आदिवासी क्षेत्रात जास्तीत-जास्त बचत गटांचे जाळे निर्माण करणे हे प्रशासनाचे मुख्य उद्दिष्ट आहे. महिलांची कला-कौशल्याला योग्य दिशा मिळावी तसेच ग्राहकांच्या मागणीनुसार उत्पादनात वैविध्य आणून त्यांना मोठी बाजारपेठ मिळवून देण्यासाठी मेळघाट हाटची निर्मिती करण्यात आली आहे.

विक्रीसाठी आणलेल्या साहित्यांना राष्ट्रीय स्तरावर योग्य भाव मिळण्यासाठी विक्री साहित्याचे उत्तम मार्केटिंग, आकर्षक पॅकिंग व प्रभावी ब्रँडिंग करणे ही काळाची गरज आहे. हीच बाब लक्षात घेऊन महिला बचत गटांना या तांत्रिक बाबींचे प्रशिक्षण देण्यात येत आहे. या उत्पादित मालाला राज्यासह संपूर्ण देशात बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनामार्फत विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत. मेळघाटातील धारणी तसेच चिखलदरा तालुक्यातील स्वयंसहाय्यता महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या मालाला कायमस्वरूपी बाजारपेठ मिळावी, याच हेतूने हे मेळघाट हाट विक्री केंद्र सुरू करण्यात आले आहे. या केंद्राचे वैशिष्ट्य म्हणजे येथे एकाच छताखाली मेळघाटातील ४७ प्रकारच्या विविध वस्तू विक्रीसाठी उपलब्ध आहेत. प्रथम टप्प्यात एकूण ६० स्वयंसहाय्यता महिला बचत गटांच्या उत्पादनांचा यात समावेश करण्यात आला होता. त्यामध्ये प्रामुख्याने बांबूपासून निर्मित विविध उत्पादने, तृणधान्यांमध्ये सावा, कुटकी, ज्वारी, बाजरी तसेच कडधान्य, गहू, लाल तांदूळ, तूर दाळ, विविध प्रकारची लोणची, चिखलदऱ्याची जगप्रसिद्ध कॉफी, मध आणि शुद्ध तूप यांचा समावेश आहे. याशिवाय गृहशोभेच्या वस्तू आणि आरोग्याच्या दृष्टीकोनातून पौष्टिक खाद्यान्ने देखील येथे उपलब्ध आहेत.
या केंद्राला आधुनिक मॉलचे स्वरूप देण्यात आले असून, येथे स्वतंत्र गोदाम, पॅकेजिंग आणि लेबलिंग युनिटची व्यवस्था करण्यात आली आहे, ज्यामुळे ग्राहकांना खरेदीचा एक वेगळा अनुभव मिळत आहे.
खादी व ग्रामोद्योग मंडळ आणि महिला आर्थिक विकास महामंडळाच्या वतीने स्वातंत्र्यदिनानिमित्त मेळघाट हाट येथे 'खादी महोत्सवा'चेही आयोजन करण्यात आले होते. यावेळी कस्तुरबा सोलर खादी महिला समिती अंतर्गत धारणी तालुक्यातील महिलांनी कापसापासून सूत आणि सुतापासून कापड ते गारमेंटपर्यंतच्या उत्पादनांची निर्मिती करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. या क्लस्टरतर्फे महिलांनी उत्पादीत केलेला माल खादी महोत्सवात विक्रीसाठी ठेवण्यात आला होता. विकेंद्रित सोलर चरखा समूहाच्या कार्यक्रमांतर्गत लाभार्थी महिलांनी तयार केलेली दर्जेदार खादी आणि सौर खादी उत्पादने येथे सवलतीच्या दरात नागरिकांना उपलब्ध करून देण्यात आली होती, ज्याला अमरावतीकरांचा चांगला प्रतिसाद मिळाला.
प्रशासनाच्या या अभिनव उपक्रमामुळे मेळघाटातील आदिवासी महिला भगिनींच्या बचत गटांना विक्री आणि विपणनासाठी एक सक्षम प्लॅटफॉर्म मिळाला असून, यामुळे महिला सक्षमीकरणासह आदिवासी क्षेत्रातील आर्थिक विकासाला निश्चितच मोठी गती मिळणार आहे.

**– अपर्णा यावलकर**
**माहिती अधिकारी,**
**जिल्हा माहिती कार्यालय, अमरावती**

# व्यावसायिक प्रशिक्षणातून महिलांची प्रगतीकडे वाटचाल

महिलांनी आत्मनिर्भर बनून स्वतःच्या पायावर ठामपणे उभे राहावे, यासाठी केंद्र व राज्य शासन विविध प्रभावी योजना राबवत आहे. या योजनांमधून मुली व महिलांना केवळ मोफत उच्च शिक्षणच नव्हे, तर रोजगाराभिमुख व व्यवसायाभिमुख प्रशिक्षणाचीही व्यापक संधी उपलब्ध करून दिली जात आहे. परिणामी, अनेक महिला आज नोकरी तसेच स्वयंरोजगाराच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या सक्षम होत आहेत.

कौशल्य विकास विभागाची पुढाकारपूर्ण योजना

कौशल्य विकास, उद्योजकता व रोजगार मार्गदर्शन विभागाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या शिल्पकारागीर प्रशिक्षण योजनेत मुली व महिलांसाठी विशेष आरक्षण देण्यात आले आहे. दहावी उत्तीर्ण अथवा अनुत्तीर्ण विद्यार्थिनींनाही या योजनेत प्रवेशाची संधी उपलब्ध आहे. सांगली जिल्ह्यातील शासकीय तसेच खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमार्फत एक व दोन वर्षांचे विविध अभ्यासक्रम राबविले जात आहेत. या योजनेचा लाभ घेत अनेक महिलांनी प्रतिष्ठित नोकऱ्या मिळवल्या असून, काहींनी स्वतःचे उद्योग उभारून यशाची नवी उंची गाठली आहे. अधिक माहितीसाठी जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालय, सांगली येथे (दूरध्वनी: ०२३३-२३१०१३९) संपर्क साधता येईल.

आरसेटीमार्फत मोफत कौशल्य प्रशिक्षण

जिल्हा अग्रणी कार्यालयाच्या समन्वयातून बँक ऑफ इंडिया स्टार आरसेटी, सांगली या संस्थेमार्फत ग्रामीण भागातील महिलांसाठी मोफत कौशल्य विकास प्रशिक्षण दिले जाते. १८ ते ५० वयोगटातील, आठवी ते दहावी शिक्षण घेतलेल्या महिलांना या योजनेचा लाभ घेता येतो. विशेषतः अनुसूचित जाती-जमाती, बचत गट सदस्य, बीपीएल कुटुंबे व विविध शासकीय योजनांतील लाभार्थ्यांना प्राधान्य दिले जाते. या प्रशिक्षणात मोफत निवास, प्रशिक्षण साहित्य, केंद्र शासन मान्यताप्राप्त प्रमाणपत्र तसेच प्रशिक्षणानंतर दोन वर्षे मार्गदर्शन व बँक कर्जासाठी सहाय्य दिले जाते. अधिक माहितीसाठी (मो. ९१५८५०२०१० / ९६८९७९८००४ / ९८९०१९७३४४) येथे संपर्क साधावा.

नगरपरिषदांकडून स्वयंरोजगाराला चालना

सांगली जिल्ह्यातील नगरपरिषद व नगरपंचायतींमार्फत महिला व बालकल्याणासाठी ५ टक्के निधी राखीव ठेवण्यात आला आहे. या निधीतून फॅशन डिझायनिंग, ब्युटी पार्लर प्रशिक्षण यांसारखे सामूहिक कोर्स राबविले जात असून, महिलांना स्वयंरोजगारासाठी सक्षम केले जात आहे. तसेच अंगणवाडी दुरुस्ती यांसारख्या कामांनाही निधी उपलब्ध करून दिला जातो.

आत्मनिर्भरतेकडे महिलांची वाटचाल

शासकीय योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे सांगली जिल्ह्यातील महिलांमध्ये आत्मनिर्भरतेची नवी उर्मी निर्माण झाली आहे. कौशल्य, शिक्षण आणि आर्थिक सहाय्याच्या बळावर महिला आता केवळ घरापुरत्या मर्यादित न राहता समाजाच्या आर्थिक विकासातही महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. त्यांच्या स्वप्नांना पंख मिळाले आहेत.

**– संप्रदा बीडकर,**
**जिल्हा माहिती अधिकारी,**

◆ पान १/४ वरून पुढे...

## डॉनाल्ड ट्रम्प....

प्रतिक्रिया देताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, राष्ट्राध्यक्ष ट्रम्प, फर्स्ट लेडी मेलानिया ट्रम्प आणि उपराष्ट्रपती हे वॉशिंग्टन डीसीमधील घटनेनंतर सुरक्षित आहेत, हे जाणून समाधान वाटले. मी त्यांच्या उत्तम आरोग्यासाठी शुभेच्छा देतो. लोकशाहीत हिंसेला कोणतंही स्थान नाही आणि अशा कृत्यांचा पूर्णपणे निषेध केला पाहिजे, असे त्यांनी म्हटले.
मिळालेल्या माहितीनुसार, शनिवारी रात्री वॉशिंग्टनच्या हिल्टन हॉटेलमध्ये रात्रीच्या जेवणाचा कार्यक्रम सुरू होता. यावेळी अचानक मोठे आवाज झाले. सुरक्षेचा धोका ओळखून 'सीक्रेट सर्व्हिस'च्या अधिकाऱ्यांनी तात्काळ डोनाल्ड ट्रम्प आणि त्यांची पत्नी मेलानिया ट्रम्प यांना सुरक्षित ठिकाणी हलवले. सुरक्षा दलांनी केलेल्या कारवाईत एका सशस्त्र संशयित हल्लेखोराला गोळ्या घालून ठार करण्यात आले असून दुसऱ्या एका संशयिताला ताब्यात घेतल्याची प्राथमिक माहिती आहे.

## आधी छत्रपती....

त्यावर काही लोकांनी त्याचा वेगळा अर्थ काढून माझ्यावर आरोप केले. परंतु या प्रकारामुळे ज्यांच्या भावनांना ठेच पोहोचली असेल त्यांची मी माफी मागतो, असे धीरेंद्र शास्त्री म्हणाले.
जगतोही शिवाजी महाराजांसाठी आणि वेळ आली तर मरेनही शिवाजी महाराजांसाठी...
यापुढे माझे विधान चुकीच्या पद्धतीने दाखविण्यात येऊ नये, असे उलट खापर त्यांनी माध्यमांवरच फोडले. आम्ही जगतोही शिवाजी महाराजांसाठी आणि वेळ आली तर मरेनही शिवाजी महाराजांसाठी... असे धीरेंद्र शास्त्री म्हणाले.
हिंदू मुलींनी काली, दुर्गा बनावे मात्र बुरखेवाली बनू नये
नागपुरात २६ एप्रिल पासून पाच दिवसीय रामकथा आहे. हिंदुत्व जागृत करण्यासाठी मी त्यातून आवाहन करणार आहे. मुंबई, नागपूर, महाराष्ट्रात लव्ह जिहादचे प्रकरणे खूप वाढत आहेत. प्रेम करणे गुन्हे नाही मात्र संस्कृतीचे हनन चुकीचे आहे. हिंदू मुलींना मी जागृत करणार आहे. मुलींनी काली, दुर्गा बनावे मात्र बुरखेवाली बनू नये, असे धीरेंद्र शास्त्री म्हणाले.
मुख्यमंत्री फडणवीस लव्ह जिहाद प्रकरणी चांगले काम करताहेत
महाराष्ट्राचे मुख्यमंत्री लव्ह जिहाद प्रकरणी चांगले काम करत आहे. लव जिहाद विरोधात कठोर कायदा बनवा. काही लोक इन्स्टा, फेसबुकच्या माध्यमातून हिंदू मुलींना फसवतात. लव्ह जिहाद मुक्त भारत, महाराष्ट्र व्हावा, असेही ते म्हणाले.

## तांबवा येथे...

चोरट्यांनी गावातून पोबारा केला. दरम्यान, पोलिसांनी घटनास्थळी श्वान पथक व ठसे तज्ज्ञांचे पथक पाचारण करण्यात आले होते. शंकर चाटे यांच्या फिर्यादी वरून अज्ञात चोरट्यां विरुद्ध गु. र. नं. २३९/ २०२६ भा. न्या. सं. ३०५(ए), ३३१(४) नुसार केज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. तपास पोलिस उपनिरीक्षक लक्ष्मण कीर्तने हे करीत आहेत.

## राज्याच्या शिक्षण...

देणारे लहान- लहान मुले असतात याची तरी जाणिव महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषदेने ठेवणे आवश्यक होते. महिनाभरापुर्वीच शिक्षण विभागाने शाळेच्या वेळा कमी करून त्या सकाळच्या सत्रात केलेल्या आहेत. मग महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषदेला एवढ्या प्रचंड उन्हात (४१ अंश डिग्री सेल्सीयस तापमान) परिक्षा घेण्याची गरज काय होती ? परिक्षेचे नियोजन करतांना महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषदेच्या एसीत बसणाऱ्या अधिकाऱ्यांना हे कळले नाही का ? असे अनेक प्रश्न उपस्थित होऊ लागले आहेत. आज बीड शहरातील अनेक परिक्षा केंद्रांवर विद्यार्थ्यासह पालकांची लाही-लाही होत असतांना दिसुन आली. काही केंद्रांवर पंखे नव्हते तर काही केंद्रांवर पिण्याच्या थंड पाण्याची सोय देखील नव्हती. काही ठिकाणी तर एक-दोन विद्यार्थ्यांना उन्हामुळे चक्कर आल्याचेही सांगितले जात आहे. एवढ्या प्रचंड उन्हात राज्य परिक्षा परिषदेला शिष्यवृत्ती परिक्षा घेण्याची घाई का झाली असावी ? याची राज्य शासनाने तातडीने चौकशी करावी अशी मागणी पालकांमधुन होत आहे.

## पैशाची लवकर....

याचा अहवाल प्रशासनाने जाहीर करावा. तसेच निष्क्रिय अधिकाऱ्याला तात्काळ निलंबित करावे. गेल्या १० वर्षांत त्या प्रशासकाने नेमके काय केले, हा प्रश्न उपस्थित होत आहे. ऑक्टोबर २०२३ पासून ज्ञानराधा अर्बन बँकेचे व्यवहार थांबले असून जवळपास तीन वर्षे उलटली आहेत. तरीही जिल्हा प्रशासन कोणतीही ठोस कारवाई करत नाही. लाखो ठेवीदार उपासमारीला सामोरे जात आहेत. अनेकांच्या मुलींचे विवाह थांबले, मुलांचे शिक्षण खंडित झाले, तर वृद्धांना औषधोपचार मिळत नाहीत. कुटे ग्रुपची एकूण मालमत्ता साधारणपणे ६,००० कोटींपेक्षा जास्त असून ठेवीदारांचे सुमारे २,३०० कोटी देणे आहे. आजच्या बाजारमूल्यानुसार मालमत्तेचा लिलाव केल्यास ठेवीदारांचे पैसे पूर्णपणे परत होऊ शकतात. तरीही प्रशासन हातावर हात धरून बसले आहे. कुटे ग्रुपकडे बँकांचे कर्ज असले तरी सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार अशा प्रकरणांमध्ये सामान्य नागरिकांना प्रथम प्राधान्य दिले जाते. त्यामुळे शासनाने तात्काळ निर्णय घेऊन ठेवीदारांचे पैसे परत करावेत, अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी दिला आहे.

## प्रा.आनंद घोंगडे...

या संशोधनाचा उपयोग ग्रामीण भागातील सामान्य शेतकरी, शेतमजूर,आणि कारागीर, स्वयं सहायता महिला बचतगट या सर्वांना होणार आहे. या संशोधनामुळे बँकिंग सेवा ह्या केवळ शहरा पुरत्याच मर्यादित आहेत की,त्या खऱ्या अर्थाने खेड्यापर्यंत पोहचल्या याचेही विश्लेषण समाजाला मिळणाऱ्या मिळते.प्रा.आनंद घोंगडे हे मागील २० वर्षापासून बाबुजी आव्हाड महाविद्यालयात कार्यरत असून त्यांचे अर्थशास्त्र विषया निगडीत विविध विषयांवर संशोधनपर लेख प्रकाशित झाले आहेत. त्यांच्या या यशाबद्दल पार्थ विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अभय आव्हाड, उपाध्यक्ष सुरेशराव आव्हाड,प्राचार्य डॉ.बी.ए.चौरे,आयु.एस.आर. सांगडे,मार्गदर्शक डॉ.दिलीप मिसाळ,डॉ.डी.बी.पवार व महाविद्यालयीन प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

## कुटुंब कल्याण....

जबाबदारी झटकून रुग्णाला धोकादायक स्थितीत ठेवू शकतात का? हा खरा प्रश्न आहे. या प्रकाराची आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनीही दखल घेतली. त्यांनी थेट महिला रुग्णांशी संवाद साधला. मात्र, त्याआधीच या महिलांना प्रशासनाकडून काय बोलावे याचे प्रशिक्षण दिल्याचा संशय व्यक्त होत आहे. त्यामुळे मंत्र्यांकडे तक्रार झाली नसल्याची चर्चा आहे. आता आबिटकर कारवाई करणार की, डॉक्टरांच्या खुलाशावर समाधान मानून त्यांना पाठीशी घालणार, याकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

## पत्नीला फोन...

दाखल केली आहे. पोलिसांनी तात्काळ गुन्हा नोंदवत तपासाला सुरुवात केली. पोलीस या घटनेचा तपास करत असून या घटनेने खळबळ उडाली आहे.

## मौलाली बाबा...

पौर्णिमा यात्रोत्सव, सायंकाळी मिरवणूक काढली जाणार असुन दि. २ मे रोजी दुपारी कुस्त्यांचा आखाडा रंगणार आहे. हा यात्राउत्सव लोकवर्गणीतून साजरा केला जात असून, सरपंच, उपसरपंच, सर्व सदस्य, तसेच यात्रा कमिटी व ग्रामस्थ, दर्याचे मुलानी परिश्रम घेतात.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# जिल्ह्यात 73.69 टक्के मतदारांचे मॅपिंगचे काम पूर्ण; मतदारांमध्ये जनजागृती करण्याचे निर्देश

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

विशेष संक्षिप्त पुनरिक्षण (SIR) अंतर्गत जिल्ह्यात मतदार मॅपिंगचे काम सुरू आहे. या मोहिमेत दि. २४ एप्रिल पर्यंत एकूण ३२ लाख ५१ हजार ८६२ मतदारांपैकी २३ लाख ९६ हजार ३२३ मतदारांचे मॅपिंग पूर्ण झाले असून एकूण प्रगती ७३.६९ टक्क्यांपर्यंत पोहोचली आहे,अशी माहिती उपजिल्हा निवडणूक अधिकारी सविता चौधरी यांनी दिली आहे. उर्वरित काम गतिने पूर्ण करण्यासाठी मतदारांमध्ये जनजागृती करण्यात यावी असे निर्देशही देण्यात आले. विधानसभा मतदारसंघनिहाय प्रगतीमध्ये सिल्लोड (८६.३९%), कन्नड (८९.८०%), फुलंब्री (६९.६८%), औरंगाबाद मध्य (५४.९०%), औरंगाबाद पश्चिम (५८.८५%), औरंगाबाद पूर्व (५८.०८%), पैठण (८२.२१ %), गंगापूर (७७.५७%) आणि वैजापूर (९२.५३%) अशी नोंद झाली आहे. या कामकाजाचा आढावा घेण्यासाठी उपजिल्हा निवडणूक अधिकारी श्रीमती सविता चौधरी यांनी नायब तहसीलदार निवडणूक यांची बैठक घेतली. बैठकीत प्रत्येक मतदारसंघातील प्रगतीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. ज्या ठिकाणी प्रगती कमी आहे, तेथे विशेष लक्ष देऊन काम गतीमान करण्याच्या सूचना देण्यात आल्या. मतदार मॅपिंग मोहिमेत जनजागृती व लोकसहभाग वाढविण्यासाठी लोकप्रतिनिधी, नगरसेवक तसेच बूथ लेव्हल एजंट (BLA) यांचा सक्रिय सहभाग घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यांच्या माध्यमातून नागरिकांपर्यंत माहिती पोहोचवून शंभर टक्के मॅपिंग पूर्ण करण्यावर भर देण्यात येत आहे.

ज्या भागांमध्ये कामाची गती मंद आहे, तेथे संबंधित अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष क्षेत्रभेट देऊन कामकाज वेगाने पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या असून जिल्हा प्रशासनाकडूनही प्रत्यक्ष फिल्ड भेटी घेतल्या जाणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. दरम्यान, नागरिकांनी या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवून मतदान मॅपिंग प्रक्रियेसाठी घरी येणाऱ्या बूथ लेव्हल अधिकारी (BLO) यांना अचूक माहिती द्यावी, तसेच सन २००२ मधील मतदार यादीत आपला समावेश कोठे होता याची माहिती उपलब्ध करून द्यावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

## ‘लेक लाडकी’ योजना अंतर्गत जिल्ह्यातील ५३१२ मुलींना लाभ

**जालना । प्रतिनिधी**




जिल्ह्यातील बालिकांच्या सक्षमीकरणासाठी जिल्हा परिषदेतील जिल्हा महिला व बालविकास विभागामार्फत ही योजना प्रभावीपणे राबविण्यात येत असलेल्या ‘लेक लाडकी’ या योजनेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, आतापर्यंत जिल्ह्यातील एकूण ५ हजार ३१२ मुलींना या योजनेचा लाभ मिळाला असल्याची माहिती जिपच्या महिला बाल विकास अधिकारी श्रीमती कोमल कोरे यांनी दिली.

‘लेक लाडकी’ या योजनेचा मुख्य उद्देश मुलींच्या जन्माचे स्वागत करणे, स्त्री-भ्रूणहत्या रोखणे, बाल विवाह थांबविणे, मुलांच्या शिक्षणास चालना देणे हा आहे. तसेच या योजने अंतर्गत पात्र कुटुंबातील मुलींना टप्प्याटप्प्याने आर्थिक सहाय्य दिले जाते. मुलीच्या जन्मापासून ते तिच्या शिक्षणाच्या विविध टप्प्यांपर्यंत ही मदत उपलब्ध करून दिली जाते. या योजने अंतर्गत मूलींना जन्मानंतर ५ हजार रुपये तर इयत्ता पहिली ६ हजार रुपये, इयत्ता ७ वी गेल्यावर ७ हजार रुपये, अकरावी ८ हजार रुपये तसेच लाभार्थी मुलींचे वय १८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर तिला ७५ हजार रुपये याप्रमाणे एकुण रुपये १,०१००/- लाभ देण्यात येतो. महिला व बाल विकास विभाग जि.प. जालनामार्फत राबविण्यात येतात. या योजनेमुळे मुलींचा जन्मदर वाढविणे, मुलींच्या शिक्षणाबाबत प्रोत्साहन तथा खात्री देणे व मुलींच्या शिक्षणास हातभार लागण्यास मदत झाली आहे ‘लेक लाडकी’ योजना ही केवळ आर्थिक मदत नसून समाजातील मुलींबाबतचा दृष्टिकोन बदलण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल ठरत आहे. या योजनेमुळे मुलगी खऱ्या अर्थाने कुटूंबामध्ये लाडकी झाल्याचे चित्र दिसुन येत आहे.

## बलभीममध्ये मायक्रोसॉफ्ट एक्सेल, वर्ड आणि ईआरपी सॉफ्टवेअर विषयावर कार्यशाळा संपन्न

**बीड । प्रतिनिधी**



बलभीम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या वतीने दि. २५ एप्रिल २०२६ रोजी महाविद्यालयातील प्रशासकीय व शैक्षणिक विभागातील कर्मचाऱ्यांसाठी एक दिवसीय मायक्रोसॉफ्ट वर्ड, एक्सेल आणि ईआरपी सॉफ्टवेअर या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. संतोष उंदरे, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे प्रमुख डॉ. अनिल चिंधे, प्रबंधक श्री. पी. पी.डावकर, डॉ. पी.डी. जावळेपाटील व प्रमुख मार्गदर्शक म्हणून संगणकशास्त्र विभागाचे डॉ.गोकुळ शिंदे हे उपस्थित होते. डॉ. गोकुळ शिंदे यांनी आपल्या प्रमुख मार्गदर्शनात दैनंदिन कामकाजात मायक्रोसॉफ्ट एक्सेल आणि वर्ड चा प्रभावी पद्धतीने उपयोग करून दैनंदिन कामकाज सुलभ करण्याचे प्रात्यक्षिकासह विस्तृत असे मार्गदर्शन केले. तसेच ईआरपी सॉफ्टवेअरच्या माध्यमातून तयार होणारे विविध रिपोर्ट्स आणि त्याची मांडणी यावर देखील मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. संतोष उंदरे यांनी नवनवीन सॉफ्टवेअरच्या माध्यमातून दैनंदिन कामकाजात सुलभता आणण्यासाठी व कामाचा ताण हलका व्हावा यासाठी कर्मचाऱ्यांनी कायम अद्ययावत गोष्टी शिकण्यासाठी तत्पर असले पाहिजे. त्यामुळे शैक्षणिक संस्थांची कायम गुणात्मक पद्धतीने वाढ होते असते असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाच्या सुरूवातीस समन्वयक डॉ. अनिल चिंधे यांनी प्रास्ताविकातून कार्यशाळा आयोजित करण्यामागचा हेतू स्पष्ट करताना सांगितले की नवीन शैक्षणिक धोरणामुळे कर्मचाऱ्यांवर कामाचा वाढलेला ताण कमी करण्याच्या दृष्टीने मायक्रोसॉफ्ट एक्सेल,वर्ड आणि ईआरपी सॉफ्टवेअरचे प्रशिक्षण घेण्याचे ठरवले होते, त्यातून दैनंदिन कामकाज सोपे होऊन विद्यार्थ्यांची प्रवेश, परीक्षा संबंधित कामे तत्परतेने करण्यासाठी या कार्यशाळेचे आयोजन केल्याचे सांगितले. या कार्यशाळेचे सूत्रसंचालन डॉ. अरविंद आघाव यांनी केले तर आभारप्रदर्शन डॉ. प्रमोद जावळेपाटील यांनी केले. या कार्यशाळेस महाविद्यालयातील प्रशासकीय, शैक्षणिक विभागातील कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मयत अनोळखी महिले विषयी माहिती कळविण्याचे आवाहन

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

रेल्वे स्टेशन पोलीस चौकी शेजारील पत्र्याच्या शेडजवळ बेशुद्ध अवस्थेत आढळून आलेल्या महिलेस घाटी रुग्णालयात दाखल केले असता तिच्यावर उपचार सुरु असतांना त्यास डॉक्टरांनी दि १५ एप्रिल रोजी मयत घोषीत केले. या प्रकरणी वेदांत नगर पोलीस स्टेशनला अकस्मात मृत्यू नोंद करण्यात आली असून अनोळखी मयत महिलेबाबत माहिती कळविण्याचे आवाहन वेदांत नगर पोलीस निरीक्षक यांनी केले आहे. मयताचे वर्णन- नाव (पुर्ण नाव पत्ता माहीत नाही.), वय अंदाजे ६० वर्षे, अंगात केशरी रंगाची सलवार त्यावर सोनेरी डिझाईन, रंग गव्हाळ, चेहरा लांबट गोल, उंची पाच फुट,केस काळे -पांढरे.या वर्णनाच्या महिलेबाबत काही माहिती मिळाल्यास वेदांत नगर पोलिसांत किंवा सहायक फौजदार एन.व्ही. खराडकर,मो.नं ८८०५०५८२२२ यांच्याशी संपर्क साधावा,असे आवाहन पोलीस निरीक्षक, वेदांत नगर पोलीस स्टेशन यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

## गंगाखेड येथे “माझं गाव, आरोग्य संपन्न गाव” कार्यशाळा उत्साहात संपन्न



**गंगाखेड । प्रतिनिधी**

माझं गाव, आरोग्य संपन्न गाव या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी गंगाखेड पंचायत समितीच्यावतीने तालुकास्तरीय कार्यशाळा उत्साहात पार पडली.

या वेळी पंचायत समितीचे सभापती मनोज लक्ष्मणराव मुंडे यांनी सर्व गावांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करण्याचे आवाहन केले. गंगाखेड तालुक्याची कामगिरी जिल्हा व राज्य स्तरावर उल्लेखनीय व्हावी, यासाठी सर्वांनी एकजुटीने प्रयत्न करणे आवश्यक आहे, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सहाय्यक गटविकास अधिकारी जयराम मोडके होते. उपसभापती सारिका खांडेकर, पंचायत समिती सदस्य, विविध विभागांचे अधिकारी व आरोग्य कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तालुका आरोग्य अधिकारी डॉ. मनोजकुमार दीक्षित यांनी प्रास्ताविकात अभियानाचे उद्दिष्ट स्पष्ट करताना सांगितले की, ग्रामीण भागातील आरोग्य सेवांची गुणवत्ता वाढविणे, प्रतिबंधात्मक उपायांना चालना देणे आणि ग्रामस्तरावर जनसहभाग वाढविणे यावर भर दिला जाणार आहे. यासाठी ठोस कृती आराखडा तयार करून अंमलबजावणी केली जाणार आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. भरत भोसले यांनी केले, तर आभार प्रदर्शन श्री कळसाईतकर यांनी केले.

ही कार्यशाळा तालुक्यातील आरोग्य यंत्रणा, पदाधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सक्रिय सहभागामुळे यशस्वी ठरली.

कार्यक्रमास पंचायत समिती सदस्य प्रतापराव कदम, शरदराव काळे, समाधान चिलगर, बन्सीधर मुलगीर, गणेश माने, विजय मुंडे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.मनोजकुमार दीक्षित, वैद्यकिय अधिकारी डॉ. आलीम, डॉ .मुंडे, डॉ भोसले, डॉ.शिंदे,डॉ. खिचडे डॉ. जुनेद,क्षयरोग विभागाचे डॉ. प्रसाद केंद्रेकर, व विस्तार अधिकारी भारत नरवाडे, विनोद डोंगरजकर आदीची प्रमुख उपस्थिती होती.

## जागतिक हिवताप दिन नांदेड येथे साजरा




**नांदेड । प्रतिनिधी**

जागतिक हिवताप दिन निमित्त नांदेड येथे जनजागरण रॅली काढण्यात आली. यावेळी मनपा अतिरिक्त आयुक्त निलेश सुंकेवार,जिल्हा हिवताप अधिकारी डॉ श्री अमृत चव्हाण,वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ हनुमंत रिठे,शहर क्षयरोग अधिकारी डॉ बद्दीओदीन सर यांच्या हस्ते जागतिक हिवताप दिन महात्मा गांधी पुतळा पासुन ते भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर पुतळ्या पर्यंत रॅलीस हिरवी झेंडी दाखवून सुरुवात केली. यावेळी सहाय्यक अधिक्षक विजय चव्हाण,आरोग्य पर्यवेक्षक संजय भोसले,गंगाधर गनलेवार, आरोग्य निरीक्षक माधव कोल्हे,सत्यजीत टिप्रेसवार, व्यंकटेश पुलकंठवार, बालाजी निलपत्रेवार,अरुण आळणे, सुरेश आरगूलवार, मनोहर खानसोळे, प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी विलास नाईक, सचिव दळवी,राजु शेट्टे, वैभव कौशल्ये,आरोग्य कर्मचारी पुष्पराज राठोड, गणेश

दैनिक मराठवाडा पत्र दि. २७/०४/२०२६

**टी.सी. हरवला आहे.**

**आनिल गोरखनाथ रुपनर या नावाचा इयत्ता दहावी पास चा टीसी आडगाव ते माजलगाव प्रवासा दरम्यान हरवला आहे, सापडल्यास संपर्क साधावा .**

**मो ९०९६४६३९००**

## सेवली येथे ‘छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर’ उत्साहात; १२०० शेतकऱ्यांची उपस्थिती

**जालना । प्रतिनिधी**

जालना तालुक्यातील मौजे सेवली येथे दिनांक २३ एप्रिल, २०२६ रोजी ‘छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर’ मोठ्या उत्साहात पार पडले. या शिबिरात कृषी विभागाच्या विविध शासकीय योजनांची माहिती देण्यात आली तसेच नागरिकांच्या समस्या ऐकून त्यावर त्वरित तोडगा काढण्यात आला. या समाधान शिबिरास आमदार बबनराव लोणीकर, उपविभागीय अधिकारी जालना रामदास दौंड, तहसीलदार श्रीमती छाया पवार, तालुका कृषी अधिकारी व्ही.जे. राठोड, मंडळ कृषी अधिकारी प्रियांका क्षीरसागर, भरत नागरे, उप कृषी अधिकारी देशमुख यांच्यासह कृषी विभागाचे सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. शिबिरात कृषी विभागाच्या वतीने विविध योजनांबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. यामध्ये पीएम किसान योजना अंतर्गत त्रुटी असलेल्या लाभार्थ्यांच्या नोंदी दुरुस्त करून त्यांना लाभ मिळवून देण्यात आला. तसेच प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना (झचघडध), कृषी यांत्रिकीकरण योजना, माती नमुना तपासणी, गोपीनाथ मुंडे अपघात विमा योजना आणि एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान यांसारख्या योजनांची माहिती शेतकऱ्यांना देण्यात आली. यावेळी कृषी यांत्रिकीकरण योजनेअंतर्गत प्रातिनिधिक स्वरूपात काही शेतकऱ्यांना ट्रॅक्टरचे वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. तसेच सोयाबीन, करडई, मोहरी, उडीद, भुईमूग आदी पिकांच्या माहितीपत्रिकांचे वितरण करून शेतकऱ्यांना आधुनिक शेती तंत्रज्ञानाची माहिती देण्यात आली. शिबिरात सेवली महसूल मंडळातील उत्कृष्ट उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांनी फळपिके व भाजीपाला पिकांचे नमुने प्रदर्शित केले. टोमॅटो, भेंडी, मिरची, हळद, फ्लॉवर, दोडका, वांगे यांसह ड्रॅगन फ्रूट, टरबूज आणि चिया सीड्स यांसारख्या पिकांचे एकूण २५ नमुने स्टॉलवर मांडण्यात आले होते. या स्टॉलला भेट देणाऱ्या शेतकऱ्यांनी पिकांबाबत सविस्तर माहिती जाणून घेतली. तसेच नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (टप्पा २) अंतर्गत प्रातिनिधिक स्वरूपात पूर्वसंमती प्रमाणपत्रांचे

# खत टंचाई, लिंकीग व काळा बाजार रोखण्यासाठी जिल्हाधीकाऱ्यांची कृषी सेवा केंद्रावर धडक तपासणी

**नांदेड । प्रतिनिधी**



खरीप हंगामच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी नवीन मोंढा, नांदेड येथील वसुंधरा फर्टीलायझर्स कृषीनिविष्ठा विक्री केंद्रास तसेच गोदामास भेट देवून साठा केलेल्या खताची तपासणी केली तसेच श्री फर्टीलायझर्स कृषी सेवा केंद्र येथे अचानक भेट देऊन बाजारातील खते व बियाणे पुरवठा व विक्री संदर्भात माहिती घेतली. कृषी निविष्ठा विक्रेते यांचे परवाने, साठा रजिस्टर, इ-पॉस मशीनची तपासणी करून प्रत्यक्षात खताचा किती साठा आहे हे तपासले. याबाबत कृषी निविष्ठा विक्रेते यांना इ-पॉस मशीन शिवाय खत विक्री करू नये तसेच खताची साठेबाजी करू नये अशा सूचना दिल्या. युरिया व डीएपीच्या विक्री बाबत जिल्ह्यातील सर्व कृषि क्रेंद्राची खरीप हंगामपूर्व १०० टक्के तपासणी पूर्ण करण्याबाबत कृषि अधिकारी गुणनियत्रण तालुका नांदेड श्रीमती चातरमल यांना सुचना देण्यात आल्या. तसेच दर्शनी भागात फलक लावण्याबाबत सुचना दिल्या. ई-पॉस वरून खतांचा अहवाल काढून प्रत्यक्ष भौतीक साठ्यासोबत व साठा रजीस्टर सोबत जुळतो किंवा कसे याची पडताळणी केली. खत विक्रीच्या भौतीक बीलांची तपासणी केली व शेतकरी बांधवांनी प्रत्यक्षात ते खरेदी केल्याची खातरजमा केली. शेतकऱ्यांना दर्जेदार व योग्य दरात कृषी निविष्ठा उपलब्ध होत आहेत का याची प्रत्यक्ष पाहणी केली. जिल्हाधिकाऱ्यांनी खत टंचाई, कृत्रीम साठेबाजी, लिकींग पद्धत व काळा बाजार होणार नाही यासाठी कडक सूचना दिल्या. त्यांनी स्पष्ट निर्देश दिले की, खतांचा साठा लपून किंवा कृत्रीम टंचाई निर्माण करण्याऱ्यावर कठोर कारवाई करण्यात येईल. लिकींग पद्धतीने विक्री केल्यास व शेतकऱ्यांची फसवणूक केल्यास तात्काळ परवाने निलंबीत करण्यात येतील असे स्पष्ट निर्देश दिले. ज्यादा दराने खत विक्री केल्यास संबंधीतावर दंडात्मक कारवाई करण्याचे स्पष्ट संकेत दिले. शेतकऱ्यांना दर्जे दार कृषी निविष्ठा उपलब्ध करून देण्याचे निर्देश देण्यात आले. बनावट व निकृष्ट दर्जाच्या निविष्टा विरूद्ध शून्य सहनशिलता धोरण राबवीण्याचे स्पष्ट केले. कृषी निविष्टा गुणवत्ता नियंत्रणासाठी सर्वतोपरी उपाययोजना करणेबाबत कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांना सुचना देण्यात आल्या. यावेळी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत, कृषी विकास अधिकारी अनिल कुमार ऐतवाडे विभागीय तंत्र अधिकारी बालाजी मुंडे, मोहीम अधिकारी सचिन कपाळे, जिल्हा गुणनियंत्रण निरीक्षक अमोल पेकम तालुका गुणनियंत्रण निरीक्षक श्रीमती पुनम चातरमल, आरसीएफ जिल्हा प्रतिनिधी श्री. कापसे व इफको जिल्हा प्रतिनिधी श्री. घाडगे हजर होते.

दैनिक
# मराठवाडा पत्र

▸▸ सोमवार दि. २७ एप्रिल २०२६ 

## प्रा.आनंद घोंगडे यांना अर्थशास्त्र विषयात पीएच.डी. पदवी प्रदान



**पाथर्डी । प्रतिनिधी**

येथील बाबुजी आव्हाड महाविद्यालयाचे प्रा.आनंद घोंगडे यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ यांचेकडून पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली. त्यांनी अर्थशास्त्र या विषयात डॉ.दिलीप मिसाळ यांच्या मार्गदर्शनखाली अहमदनगर जिल्ह्यातील अग्रणी बँक योजनेचे ग्रामीण विकासातील योगदान: चिकित्सक अभ्यास या विषयावर संशोधन प्रबंध विद्यापीठात सादर केला आहे. ▶▶ उर्वरित पान २ वर

# कागदावरच रस्ते पूर्ण, आता चक्क 'दुरुस्ती'च्या नावाखाली लूट ? युवासेनेचा भ्रष्टाचाराचा आरोप

**बीड । प्रतिनिधी**

ज्या रस्त्याचे काम अद्याप पूर्णच झालेले नाही, त्याची दुरुस्ती कशाची करता ? असा संतप्त सवाल करत युवासेनेने बीडमधील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कारभारावर ताशेरे ओढले आहेत. 'पाली ते वारवटी रोड तठ-१२४' या रस्त्याच्या कामात मोठा गैरप्रकार झाला असून, याप्रकरणी युवासेना जिल्हाप्रमुख गणेश शिराळे यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे धाव घेतली आहे.

### ● काय आहे प्रकरण ?

मिळालेल्या माहितीनुसार, बीड तालुक्यातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत सन २०२४ मध्ये काही रस्ते कामांना मंजुरी देण्यात आली होती. यामध्ये प्रामुख्याने 'पाली ते वारवटी रोड VR-124' या रस्त्याचा समावेश आहे. या कामासाठी प्रशासकीय स्तरावर 'कार्यारंभ आदेश' (थेंीज्ञ जीवशी) देखील देण्यात आले होते. मात्र, प्रत्यक्षात जमिनीवर कोणतेही काम सुरू न करता किंवा काम पूर्ण न होताच, या कामाची देयके काढण्यात आल्याचा खळबळजनक आरोप निवेदनात करण्यात आला आहे.



### ● काम अपूर्ण, पण दुरुस्ती सुरू ?

निवेदनात नमूद केल्यानुसार, २०२४ मध्ये मंजूर झालेल्या या रस्त्याचे काम प्रत्यक्षात अद्याप पूर्ण झालेले नाही. मात्र, धक्कादायक बाब म्हणजे प्रशासन आता या अपूर्ण कामाची 'दुरुस्ती' करत असल्याचे भासवत आहे. मूळ कामच पूर्ण झाले नसेल, तर दुरुस्ती कशाची केली जात आहे ? असा सवाल करत हा निव्वळ शासनाची दिशाभूल करण्याचा आणि निधी हडपण्याचा प्रकार असल्याचे युवासेनेने म्हटले आहे.

### ● भ्रष्टाचाराचे संगनमत:

या प्रकरणात कंत्राटदार आणि सार्वजनिक बांधकाम विभागाचे संबंधित अभियंता यांनी संगनमत केल्याचा आरोप होत आहे. कामाचा दर्जा न तपासता आणि काम पूर्ण न करताच देयके (बिल) काढली जात असल्याने शासनाचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. पुराव्यादाखल कार्यारंभ आदेश आणि ठिकाणचे फोटोही प्रशासनाला सादर करण्यात आले आहेत.

### ● दोषींवर कारवाईची मागणी:

या गंभीर प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित शाखा अभियंता, कार्यकारी अभियंता आणि कंत्राटदारावर तात्काळ कायदेशीर कारवाई करावी, तसेच लाटलेला निधी वसूल करावा, अशी मागणी गणेश शिराळे यांनी केली आहे.



*बीड : भाजप नेत्या दबंग मा.खासदार डॉ.प्रीतमताई गोपीनाथराव मुंडे साहेब यांची भाजपा- छ. संभाजीनगर ( पश्चिम ) जिल्हा प्रभारीपदी नियुक्ती झाली याबद्दल त्यांचा जिल्हा भाजपा कार्यालय येथे हृदय पूर्वक सत्कार करताना जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ अण्णा शिराळे, नगरसेवक ॲड.गोविंद शिराळे.*

# कुटुंब कल्याण शस्त्रक्रियेनंतर ऊसतोड मजूर महिलांवर जमिनीवरच उपचार

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्याचा कणा असलेल्या ऊसतोड मजुरांच्या नशिबी असलेली परवड काही केल्या संपण्याचे नाव घेत नाही. कष्टाचे डोंगर उपसून ऊसतोडीचा हंगाम संपवून परतलेल्या महिला मजुरांना आता सरकारी दवाखान्यातही अपमानास्पद वागणूक मिळत आहे.

केज तालुक्यातील विडा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात कुटुंब कल्याण शस्त्रक्रियेनंतर पाच महिलांना चक्क जमिनीवर झोपवून उपचार केल्याचा संतापजनक प्रकार समोर आला आहे. या घटनेने आरोग्य विभागाचे ढिसाळ नियोजन चव्हाट्यावर आले आहे.

२२ एप्रिल रोजी विडा आरोग्य केंद्रात कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात एकूण १५ महिलांच्या शस्त्रक्रिया करण्यात आल्या. मात्र, आरोग्य केंद्रात केवळ १० बेड उपलब्ध होते. उर्वरित पाच महिलांना शस्त्रक्रियेसारखी गंभीर प्रक्रिया पार पडल्यानंतर चक्क जमिनीवर झोपवण्यात आले. संसर्गाचा मोठा धोका असतानाही, या महिलांना अशा असुरक्षित स्थितीत ठेवणे म्हणजे त्यांच्या जिवाशी खेळण्याचाच प्रकार आहे. या प्रकरणाची माहिती पसरल्यानंतर प्रशासनाने अजब तर्क मांडण्यास सुरुवात केली




आहे. त्या महिलांनीच आम्हाला जमिनीवर उपचार चालतील, असे सांगितले होते, असा दावा वैद्यकीय अधिकारी डॉ. रोहन गायकवाड यांनी केला आहे. मात्र, रुग्ण असुविधा असतानाही उपचार करा म्हणत असेल, तर डॉक्टर आपली ▶▶ उर्वरित पान २ वर

## पत्नीला फोन केल्याचा राग; बीडमध्ये पतीवर लोखंडी रॉड-दगडांनी जीवघेणा हल्ला; 'ती' आता माझी आहे

**बीड । प्रतिनिधी**

बीड येथून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. पत्नीला फोन केला म्हणून पतीलाच लोखंडी रॉड आणि दगडाने मारहाण केल्याचे समोर आले आहे. पतीने पोलिसांत धाव घेतली असून दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. ही घटना केज तालुक्यातील शिंदी फाटा परिसरात घडली. घटनेमुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.

पंकज दादाराव वाघमारे हे विडा येथील रहिवासी आहे. ते



गुरुवारी सकाळच्या सुमारास शिंदी फाट्याजवळील एका दुकानासमोर बसले होते. त्याचवेळी आरोपी दीपक उत्तम वाघमारे आणि त्याचा साथीदार प्रेम हे दोघे पाठीमागून येत त्यांनी पंकज यांना भेटले. या दरम्यान दोघांनीही पंकज यांच्याशी वाद घालत त्यांच्या पत्नीसोबत आक्षेपार्ह वक्तव्य केले. 'ती आता तुझी नसून माझी आहे' असे म्हणत त्यांनी पंकज यांच्यावर हल्ला चढवला. आरोपींनी लोखंडी रॉडने त्यांच्या पायावर आणि मांडीवर वार केले, तसेच डोक्यात दगड मारून गंभीर जखमी केले. एवढेच नाही तर पुन्हा पत्नीला फोन केल्यास जीवे मारण्याची धमकी पंकज याना दिली. या घटनेमुळे जखमी अवस्थेत पंकज यांनी तात्काळ पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार ▶▶ उर्वरित पान २ वर

## पोखरीघाट येथे ४२ कुस्त्यांचा फड रंगला ; ७ लाख ६५ हजारांची बक्षीसे

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील पोखरीघाट येथे अखंड हरिनाम महोत्सवानिमित्तच्या कुस्ती स्पर्धेत ४२ कुस्त्या लावण्यात आल्या. ग्रामस्थांच्या वर्गणीतून सात लाख ६५ हजारांचे रोख बक्षीस वाटप करण्यात आले.

पैलवान माउली जामदाडे व हरयाणातील राष्ट्रीय विजेता पैलवान रवींद्रकुमार यांच्यात कुस्तीचा जंगी सामना रंगला. पोखरी घाट जगद्गुरू संत तुकाराम महाराज मंदिराच्या १६ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमास क्षेत्र बेलेश्वर संस्थानचे महंत महादेव महाराज भारती, तुकाराम महाराज भारती, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र



मस्के आदी उपस्थित होते. पोखरी येथे भावार्थ रामायण व त्रिदिनी कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. मारुती महाराज चोरमुले यांच्या कीर्तनाने सांगता झाली. पोखरीघाट येथील शेतकरी शेतमजूर ग्रामस्थांनी लोक वर्गणीतून जिल्हा परिषद शाळेची इमारत उभारून शिक्षणासाठी मूलभूत सुविधा उपलब्ध केली.

## कुंभारवाडी फाट्याजवळ कारची दुचाकीला धडक, एक ठार, एक जखमी

**बीड । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील धोंडराई येथील विद्यार्थी आपल्या मावस भावासोबत आष्टी येथे सीईटीचा पेपर देण्यासाठी जात असताना भीषण अपघात झाला. भरधाव कारने दुचाकीला दिलेल्या धडकेत विद्यार्थ्याचा मृत्यू झाला, तर त्याचा मावस भाऊ गंभीर जखमी झाला आहे.

ही घटना राष्ट्रीय महामार्ग ६१ वरील कुंभारवाडी फाट्याजवळ घडली.

वैभव भारत गुंजाळ (वय १८, रा. धोंडराई) याचा आष्टी येथे सीईटीचा पेपर होता. पेपरसाठी लवकर पोहोचण्याच्या उद्देशाने




वैभव त्याचा मावसभाऊ कृष्णा जाधव (वय १९, रा. सुशी) याच्यासोबत दुचाकीवरून आष्टीकडे निघाला होता. कुंभारवाडी फाट्याच्या पुढे पोहोचले असता, समोरून येणाऱ्या भरधाव कारने त्यांच्या दुचाकीला जोराची धडक दिली.

या भीषण अपघातात दोघेही गंभीर जखमी झाले. त्यांना तातडीने बीड येथील खासगी रुग्णालयात हलवण्यात आले, मात्र प्रकृती अधिक चिंताजनक असल्याने त्यांना छत्रपती संभाजीनगर येथे हलविले. दुर्दैवाने, तिथे उपचारादरम्यान वैभव गुंजाळ याचा मृत्यू झाला. कृष्णा जाधव याच्यावर सध्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. वैभवच्या पश्चात आई, वडील, दोन बहिणी आणि चुलते असा परिवार आहे. गेवराई पोलिस ठाण्यात नोंद करण्याची प्रक्रिया सुरू होती.

## मौलाली बाबा उरूस यात्रा १ मे पासून, १५ दिवस चालणार



**बीड । प्रतिनिधी**

कडा येथील मौलाली बाबांचा उरूस यात्रेस येत्या १ मे बुद्ध पौर्णिमापासून सुरुवात होत असून, ही यात्रा १५ दिवस चालणार आहे. कडी नदीच्या तीरावर सर्वधर्मसमभाव ऐक्याचे प्रतीक म्हणून हजरत मौलाली बाबांचा दर्गा आहे. बुद्ध पौर्णिमेला हिंदू-मुस्लीम मोठ्या संख्येने एकत्र येऊन उरूस साजरा करतात. सध्या हजारो भाविक कड्यात येत आहेत. नोकरी व व्यवसायाच्या निमित्ताने बाहेरगावी असलेले या गावचे लोक यात्रेसाठी आवर्जून येतात. यात्रेच्या मुख्य दिवशी सकाळपासून ढोलताशांच्या गजरात विविध रंगाच्या फुलांनी सजवलेल्या चादरीची मिरवणूक काढत नवसपूर्ती केली जाते. चादरींची मिरवणूक काढली जाते. येत्या दि. २८ एप्रिल रोजी रात्री १२ ते ४ मौलाली बाबा यांच्या दर्ज्यास चंदन लेप लावला जाईल. दि. २९ एप्रिल रोजी सायंकाळी ५ ते ९ संदल मिरवणूक, दि. ३० एप्रिल रोजी प्रसादाचे आयोजन तर दि. १ मे बुद्ध ▶▶ उर्वरित पान २ वर

# 'अलनिनो' मुळे 2027 मध्ये संभावित असलेल्या दुष्काळाची चाहूल लागताच आ.क्षीरसागर अॅलर्ट मोडवर

### बीड शहर आणि परिसरातील पाणीपातळीच्या वाढीसाठी प्रयत्न

### काम सुरू असलेल्या पूल कम बंधार्याच्या माध्यमातून पाणी अडविण्यासाठी नियोजन

**बीड । प्रतिनिधी**

जागतिक हवामान तज्ञांनी सन २०२७ मध्ये 'अलनिनो' परिस्थिती निर्माण होऊन भीषण दुष्काळ पडण्याचा अंदाज वर्तविला आहे. संभाव्य दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर आ.संदीप क्षीरसागर लर्ट मोडवर आहेत. या अनुषंगाने बीड शहर आणि परिसरातील गावांमध्ये पाणीपातळी वाढविण्यासाठी बीड शहरातील बिंदुसरा नदीवर, काम सुरू असलेल्या पूल कम बंधार्याच्या माध्यमातून पाणी अडविण्यासाठी नियोजन सुरू आहे. याबाबत सोमवारी (दि.२७) रोजी आ.क्षीरसागर



यांनी बैठक आयोजित केली आहे. सन-२०२७ मध्ये जागतिक हवामान तज्ञांनी 'सुपर अलनिनो' निर्माण होऊन भारतावर गंभीर दुष्काळी परिस्थिती निर्माण होण्याचा अतिसंभाव्य धोका सांगितला आहे. त्या पार्श्वभूमीवर आ.संदीप क्षीरसागरांनी दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी नियोजन करण्यास सुरुवात केली आहे.बीड शहर, हद्दवाढ भाग आणि शहरालगतची गावे यामध्ये पाणी पातळी वाढविण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्यावर भर दिला असून त्यासाठी आ.संदीप क्षीरसागर, माजी आ.सय्यद सलीम नियोजन करत आहेत.

### बेल्ट टाकून याच पावसाळ्यात पाणी अडविण्याचे नियोजन

**बीड शहरात पूल कम बंधार्याचे काम सध्या सुरू आहे. हे काम प्रगतीपथावर असून सदरील काम पूर्ण होण्यासाठी आणखी बराच वेळ लागण्याची शक्यता आहे.परंतु पुढच्या वर्षी अतिसंभाव्य असलेल्या दुष्काळातून निर्माण होणारी पाणीटंचाई टाळण्यासाठी याच पावसाळ्यात बंधारा कामाच्या ठिकाणी बेल्ट टाकून याच पावसाळ्यात किमान १ ते १.५० कि.मी. पर्यंत पाणी अडविण्यासाठी योजना करणार असल्याचे आ.क्षीरसागर यांनी सांगितले आहे.**

### आज होणार संयुक्त बैठक

**यासंदर्भात सोमवारी (दि. २७) रोजी पूल कम बंधारा कामाची अंमलबजावणीसाठी असलेले प्राधिकरण राष्ट्रीय महामार्ग विभाग, जलसंधारण विभाग आणि संबंधित विभाग यांच्या संयुक्त बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.**

## खरीपाच्या पेरणीपुर्वी बीज प्रकिया, माती परीक्षण करूनच पेरणी करा

**आष्टी । प्रतिनिधी**

प्रकल्प संचालक आत्मा बीड व तालुका कृषी अधिकारी आष्टी यांच्या मार्गदर्शनाखाली मौजे बेलगाव ता.आष्टी येथे खरीप हंगाम पूर्व मोहीम सन २०२६-२७ अंतर्गत शेतकऱ्यांना माती परीक्षण माहिती,महाविस्तार ए.आय.अँप माहीती, हुमणी कीड नियंत्रण व उपाय, पेरणीपुर्वी बिजप्रक्रिया, घरगुती बियाणे उगवणक्षमता तपासणी, अनुदानित बियाणे अर्ज करणे बाबत माहिती, आत्मा गट स्थापना माहिती व गटाचे उपयोग, नैसर्गिक शेती विषयक आढावा, विविध खरीप पिका विषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी गावचे सहायक कृषी अधिकारी नितीन खरात, आत्माचे राजेंद्र धोंडे, सहायक कृषी अधिकारी वडेकर या कृषी विभागाच्या कर्मचारी यांनी मार्गदर्शन केले या वेळी गावचे सरपंच तात्यासाहेब शिंदे, उपसरपंच श्री ज्ञानेश्वर पोकळे, नैसर्गिक शेती गटाचे अध्यक्ष नानासाहेब पोकळे, प्रगतशील शेतकरी, ग्रामपंचायत सदस्य, शेतकरी वर्ग उपस्थित होता.